सभापतीस्थानी - माननीय सभापती

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या गायनाने झाला.

सदस्यांचा परिचय

श्री. आर.आर.पाटील (उप-मुख्य मंत्री) : माननीय सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. गिरीश गांधी यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे.

***

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शोक प्रस्ताव.

मु.शी. : श्री.चंद्रशेखर, माजी पंतप्रधान, आणि डॉ. जे.लिऑन डिसोझा, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

--

श्री. आर.आर.पाटील (उप-मुख्य मंत्री) : महोदय, श्री. चंद्रशेखर, भारताचे माजी पंतप्रधान, तसेच डॉ. जे. लिऑन डिसोझा, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो ..

" श्री. चंद्रशेखर, भारताचे माजी पंतप्रधान, तसेच डॉ. जे. लिऑन डिसोझा, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते. "

कै. चंद्रशेखर, भारताचे माजी पंतप्रधान यांचा अल्प परिचय

कै. चंद्रशेखर, माजी पंतप्रधान यांचा जन्म 1 जुलै, 1927 रोजी उत्तर प्रदेशच्या बलिया जिल्ह्यातील इब्राहिमपट्टी गावात झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले होते.

विद्यार्थी दशेत असताना 1949 मध्ये त्यांनी फी वाढीविरूध्द लढा दिला. 1953 मध्ये विद्यार्थी संघटनांना स्वायतत्ता मिळविण्यासाठी चळवळ उभी केली. त्याचवेळी आचार्य नरेंद्र देव यांच्या समाजवादी आंदोलनाकडे ते आकर्षित झाले. आपल्या राजकीय वाटचालीत राममनोहर लोहिया आणि लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. काही काळ प्रजा समाजवादी पक्षाचे सचिव, महासचिव म्हणून काम केले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे महासचिव, कॉंग्रेस संसदीय दलाचे सरचिटणीस व अध्यक्ष म्हणूनही काम केले होते.

1969 साली कै. चंद्रशेखर यांनी "यंग इंडिया" या नावाचे साप्ताहिक सुरु केले. "मेरी जेल डायरी" आणि "डायनामिक्स ऑफ सोशल चेंज" ही त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली. कै.चंद्रशेखर हे देशहितासाठी कुठलाही आडपडदा न ठेवता आक्रमकतेने बोलणारे "तरुण तुर्क" म्हणून 1970 च्या दशकात नावारूपाला आले. बंडखोरीकडे झुकणारा, विलक्षण स्पष्टोक्तीपणा हा

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य घटक होता. यामुळे अनेक प्रसंगी अप्रियतेचे ते धनी ठरले, परंतु त्यांनी राजकारणातील टीकाकाराची भूमिका अखेरपर्यंत सोडली नाही. मैत्रीला जागणे हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक दुर्मिळ पैलू होता. पक्षांच्या सीमारेषा त्यांच्या मैत्रीच्या आड कधीच आल्या नाहीत. ते धर्मनिरपेक्ष व समाजवादी विचारसरणीचे होते. सामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यासाठी ते आयुष्यभर झटले. भारताची प्राचीन परंपरा आणि वैभवशाली इतिहासावर त्यांचे विलक्षण प्रेम होते. देशाच्या कल्याणासाठी, अखंडतेसाठी आणि भल्यासाठी सतत प्रयत्नरत असणारे नेते होते.

कै. चंद्रशेखर यांनी राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव व त्याचे महत्त्व देशांतील सर्व जनतेला पटवून देऊन सर्वसामान्य माणसांचे दु:ख व प्रश्न जाणून घेऊन सामाजिक सद्भावना निर्माण करण्यासाठी 1983 मध्ये त्यांनी कन्याकुमारी ते दिल्लीच्या राजघाटापर्यंत 4260 कि.मी. अंतराची प्रदीर्घ पदयात्रा काढली.

राजकीय आणि सामाजिक न्यायासाठी निघालेली ही पहिली प्रभावी भारत यात्रा होती. त्यानंतर त्यांनी देशाच्या अनेक भागात भारत यात्रा केंद्रे उभी केली. त्यातील पहिले केंद्र पुण्याजवळील परंदवाडी येथे सुरू केले.

कै. चंद्रशेखर यांना राजकारणापेक्षा आपले सिध्दांत अधिक प्रिय होते. समाजवादाचे प्रखर पुरस्कर्ते, व्यक्तिवाद आणि आर्थिक उदारीकरणाचे कडवे विरोधक अशी त्यांची प्रतिमा होती. गरीब शोषितांच्या हक्काखातर सामाजिक परिवर्तनासाठी लढताना सत्तेची पर्वा न करणारे नेते अशी त्यांची खुबी बनली होती.

महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांच्या विधान भवन प्रांगणात उभारण्यात आलेल्या पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण दि. 25 नोव्हेंबर 1990 रोजी कै. चंद्रशेखर यांच्या हस्ते करण्यात आले होते. तसेच, आपल्या विधिमंडळातील सदस्यांना 18 डिसेंबर 2003 रोजी नागपूर येथे राष्ट्रकूल संसदीय मंडळातर्फे "उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार त्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

कै. चंद्रशेखर यांनी लोकसभेत नेहमी एका वडीलधाऱ्या व्यक्तिमत्वाची भूमिका बजावली. ताणतणावाचे प्रसंग संसदेला नवे नाहीत. अशा वेळी पहिल्या बाकावरचे चंद्रशेखर बोलायला उभे राहिले की, दोन्ही बाजू शांत व्हायच्या. त्यांच्या भाषणात व्यापक देशहिताची कळकळ असायची. लोकशाही मूल्यांची जपणूक करून विविध संसदीय आयुधांद्वारे देशातील अनेक प्रश्न अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने त्यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडले. त्यांना सन 1995 मध्ये लोकसभेतील कामगिरीबद्दल "सर्वोकृष्ट संसदपटू" पुरस्काराने सन्मानित करून संसदेतील सर्वश्रेष्ठ खासदार म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता.

कै. चंद्रशेखर 1962 ते 1967 या काळात राज्यसभेवर निर्वाचित झाले होते. सन 1977 ते 2004 या कालावधीत आठ वेळा ते लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. सन 1990-91 मध्ये भारताचे पंतप्रधान पद त्यांनी भूषविले.

अशा या ज्येष्ठ अभ्यासू, मुत्सद्दी, समाजवादावर निष्ठा असलेल्या समाजसेवकाचे रविवार, दिनांक 8 जुलै 2007 रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MAP.

श्री. आर. आर. पाटील ....

कै. डॉ.जे. लिऑन डिसोझा, माजी वि.प.स. व मंत्री यांचा अल्प परिचय

कै. डॉ. जे लिऑन डिसोझा यांचा जन्म 23 डिसेंबर 1919 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस. पर्यंत झाले होते.

कै. डॉ. डिसोझा यांनी गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतला होता. गोवा मर्जर कमिटीचे ते उपाध्यक्ष होते. मुंबई महानगरपालिकेवर 1952 व 1962 असे दोन वेळा ते निर्वाचित झाले होते. 1967 मध्ये मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद त्यांनी भूषविले होते. टागोर एज्युकेशन कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले.

कै.डॉ.डिसोझा 1970 मध्ये राज्यपालांद्वारा नामनियुक्त व 1975 मध्ये विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये सार्वजनिक आरोग्य, राजशिष्टाचार, दारूबंदी व राज्य उत्पादन शुल्क या खात्यांचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी कार्य केले.

अशा या समाजसेवकाचे शुक्रवार दिनांक 27 एप्रिल 2007 रोजी दु:खद निधन झाले.

(यानंतर श्री. सरफरे ... बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-07-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) B 1

DGS/ MAP/ SBT/ 13:05

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखर यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेला शोकप्रस्ताव मंजूर करावा तसेच सदनाचे आजचे दिवसाचे कामकाज स्थगित करावे अशी मी आपणास विनंती करतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री. चंद्रशेखरजी आणि डॉ. जे. लिऑन डिसोझा, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनानिमित्त जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, देश स्वतंत्र झाल्यापासून सुमारे सहा दशकांची प्रदीर्घ राजकीय कारकीर्द असलेले माजी पंतप्रधान श्री.चंद्रखेखर यांचे दिनांक 8 जुलै, 2007 रोजी वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले. उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असला तरी विद्यार्थीदशेपासून ते राजकारणाकडे आकर्षित झाले. सन 1950-51 मध्ये त्यांनी राज्यशास्त्र विषयावर एम.ए.ची पदवी संपादन केली व त्याचवेळी ते आचार्य नरेंद्र देव यांच्या संपर्कात आले. सन 1953 मध्ये त्यांनी विद्यार्थी संघटनांना स्वायत्तता मिळावी म्हणून आंदोलन केले. सन 1955 मध्ये आचार्य नरेंद्र देव यांनी त्यांना प्रजासमाजवादी पक्षाच्या उत्तरप्रदेश शाखेची जबाबदारी दिली. सन 1965 मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला व अशोक मेहता, मोहन धारिया, कृष्णकांत आणि रामधन या तरूण खासदारासमवेत त्यांनी कम्युनिस्ट विरोधी परंतु डावा गट स्थापन केला आणि त्यावेळपासूनच ते 'तरुण तुर्क' म्हणून प्रसिद्धीस आली.

सन 1975 मध्ये इंदिराजींनी आणीबाणी आणली आणि मोहन धारिया, रामधन यांच्यासोबत चंद्रशेखर यांचीही काँग्रेसमधून गच्छंती झाली. सन 1975 च्या आणीबाणीत त्यांनी मोरारजी देसाई, जयप्रकाश नारायण आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासमवेत 19 महिन्यांचा तुरुंगवासही भोगला. सन 1983 च्या जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या काळात त्यांनी कन्याकुमारीपासून राजघाटापर्यन्त पदयात्रा काढली आणि सर्वसामान्य जनतेमध्ये मिसळून त्यांचे प्रश्न समजावून घेतले. सुमारे 4 हजार कि.मी.लांबीची त्यांची "भारत यात्रा" खूपच गाजली गेली. सन 1995 मध्ये त्यांना 'सर्वोत्कृष्ट संसदपटू' म्हणून गौरविण्यात आले. देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असतांना त्यांना देशाचे पंतप्रधान पद स्वीकारावे लागले. स्वत:च्या अवघ्या 60 खासदारांच्या बळावर ते पंतप्रधान झाले परंतु हे पंतप्रधान पद औट घटकेचेच ठरले.. या छोट्याशा कालावधीत त्यांना अनेक कटू निर्णय घ्यावे लागले. आंतरराष्ट्रीय बाजारात देशातील सोने गहाण ठेवण्याचा अतिशय अप्रिय निर्णय त्यांना घ्यावा लागला. माननीय श्री.चंद्रशेखर जेव्हा देशाचे पंतप्रधान झाले तेव्हा मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू....

देशाच्या संसदेमध्ये सदस्य म्हणून काम करत होतो. त्यामुळे त्यांचे मला काम अतिशय जवळून पहाण्याचा योग आला. चंद्रशेखर, त्यांच्या संथ आणि श्रोत्यांना जिंकून घेण्याच्या भाषण शैलीबद्दल प्रसिद्ध होते. त्यामुळेच लोकसभेची निवडणूक जिंकताना ते प्रतिस्पर्ध्यांवर विक्रमी मताधिक्य मिळवीत असत. सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून सर्व राजकीय पक्षातील नेत्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते, त्यात शरद पवारसाहेबांपासून अटलजींपर्यन्त सर्वच पक्षातील प्रमुख व्यक्तींशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. अशा या ज्येष्ठ नेत्याचे वयाच्या 80 व्या वर्षी निधन झालेले असले व ते आज आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी सर्वांच्याच दीर्घकाळ स्मरणात राहतील. पार्लमेंटमध्ये जेव्हा तणावाचा प्रसंग असे त्यावेळेस श्री.चंद्रशेखर बोलण्यासाठी उभे राहिल्यानंतर टाचणी पडली तरी आवाज येईल इतकी सभागृहात शांतता निर्माण होत असे.

सभापती महोदय, डॉ.लिऑन डिसोझा यांचेही निधन एप्रिल, 2007 मध्ये झालेले आहे. सन 1970 व सन 1975 मध्ये ते या सदनाचे सदस्य होते. राज्य मंत्रिमंडळामध्ये सार्वजनिक आरोग्य, राजशिष्टाचार, दारुबंदी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले होते. मंत्री असतांना मराठी बोलण्याची अडचण असली तरी सदस्यांनी मराठीत विचारलेला प्रश्न त्यांना व्यवस्थित आकलन होत असे व ते प्रश्न विचारणाऱ्याचे समाधान होईल असा आपल्या परीने आटोकाट प्रयत्न करीत असत.

श्री.चंद्रशेखर व डॉ.डिसोझा यांच्या दु:खद निधनाबद्दल आणलेल्या शोकप्रस्तावाचे मी समर्थन करतो. सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी हा शोक प्रस्ताव मंजूर इ ाल्यानंतर सभागृहाचे आजचे कामकाज थांबवावे, अशी सूचना केली त्या सूचनेचे समर्थन करतो.

--

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय नेते श्री. आर. आर. पाटील यांनी देशाचे माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखर आणि मुंबईतील माजी विधान परिषद सदस्य कै. लिऑन डिसोझा यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै. चंद्रशेखर यांनी 80 व्या वर्षात पदार्पण केले आणि त्यांना या जगाचा निरोप घ्यावा लागला. गेले सहा महिने ते खूप आजारी होते याची मला कल्पना होती. लोकसभेच्या सभागृहामध्ये ते क्वचितच येत असत. त्यांना ज्या आजाराने ग्रासले होते त्यातून त्यांची सुटका होणे कठीण होते याची मला कल्पना होती. दिल्लीला लोकसभेमध्ये गेल्यानंतर, ज्यांचे आयुष्य लोकसभेमध्ये गेले आहे अशा ज्या काही सन्माननीय व्यक्ती भेटल्या त्यांच्यामध्ये कै. चंद्रशेखर यांचे स्थान अतिशय उच्च होते. अतिशय स्पष्टपणे बोलणारी व्यक्ती होती. कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाला बळी न पडता राजकारण करणारे व्यक्तिमत्व होते. तसे म्हटले तर संपूर्ण देशामध्ये पदयात्रेच्या माध्यमातून जनतेशी संपर्क साधणारी व्यक्ती होती. काँग्रेस पक्षात असो, जनता पक्षात असो, स्वत:च्या समाजवादी पक्षात असो, कोणत्याही पक्षात असले तरी त्यांचे स्थान अढळ होते. वैशिष्ट्य असे की, ज्यावेळी त्यांच्या स्वत:च्या पक्षाकडे केवळ 2 खासदार होते त्यावेळी ते देशाचे पंतप्रधान झाले. काँग्रेसने त्यांना निमंत्रण देऊन नंतर काँग्रेसच्या 200 खासदारांचा पाठिंबा काढून घेतला. मला पंतप्रधान करावे यासाठी पाठिंबा मागण्याकरिता ते काँग्रेस पक्षाकडे गेले नव्हते. त्यापूर्वी श्री. व्ही. पी. सिंग हे या देशाचे पंतप्रधान होते. त्यावेळी सुध्दा श्री. व्ही. पी. सिंग हे या देशाचे पंतप्रधान बनू नये अशा प्रकारचा त्यांचा प्रयत्न होता. परंतु आमच्या महाराष्ट्रातील दोन नेत्यांनी थोडेसे राजकारण केले आणि श्री. व्ही. पी. सिंग त्यावेळी पंतप्रधान झाले. त्याची चांगली किंवा वाईट फळे आज महाराष्ट्राला किंवा देशाला भोगावयास मिळत आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. परंतु कै. चंद्रशेखर यांनी त्यांच्याबद्दल आपले मत स्पष्टपणे मांडले होते. त्याकडे दुर्लक्ष केले गेले. या सत्तेच्या खेळामध्ये कोण वर चढेल आणि कोण खाली जाईल हे कोणी सांगू शकत नाही. कै. चंद्रशेखर यांना केवळ 7 महिन्यांची पंतप्रधान पदाची राजवट मिळाली परंतु त्या काळात किती तरी बरे-वाईट प्रसंग त्यांच्यावर आले. या देशातील सगळे सोने ब्रिटनमध्ये गहाण ठेवण्याचा प्रसंग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

यावा एवढी या देशाची हलाखीची परिस्थिती झालेली होती. अशा वेळी त्यांनी तो अत्यंत धाडसी निर्णय घेतला. त्यावेळी जर कदाचित ते पंतप्रधान नसते आणि दुसरी कोणी व्यक्ती पंतप्रधान पदावर असती, निर्णय घेण्याची क्षमता ज्यांच्याकडे नाही अशी व्यक्ती पंतप्रधान पदावर असती तर या देशाचे काय झाले असते हे मी सांगू शकत नाही. परंतु त्यांनी तो अतिशय कटू निर्णय घेतला. काँग्रेस पक्षात ज्यावेळी बंडखोरी करावयास पाहिजे होती त्यांवेळी त्यांनी बंडखोरी केली. काँग्रेस (आय) पक्षामध्ये असताना सुध्दा आणीबाणीची परिस्थिती आवडली नाही म्हणून त्यांनी आणीबाणीला विरोध केला. त्यासाठी त्यांनी 19 महिन्यांचा तुरुंगवास पत्करला. एकाच पक्षात असताना पक्षाच्या धोरणाविरुध्द मत मांडले म्हणून तुरुंगवास पत्करावा लागला अशी जी फार थोडी उदाहरणे देशामध्ये आहेत त्यातील कै. चंद्रशेखर यांचे अतिशय महत्वाचे उदाहरण आहे.

सभापती महोदय, कै. चंद्रशेखर हे सदनामध्ये साधारणत: एक ते दीड तास सातत्याने बसत असत. लोकसभेमध्ये एक दिवस असा उजाडला की, त्या दिवशी लोकसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा चालली होती आणि कै. चंद्रशेखर यांचे भाषण झाल्यानंतर माझे भाषण होणार होते. जसे मी या ठिकाणी सगळी भाषणे ऐकण्यासाठी बसतो तसेच त्या ठिकाणी बसत असे. माझा नंबर रात्री 2.00 वाजता लागला. त्यावेळी माझ्या अगोदर कै. चंद्रशेखर यांचे भाषण झाल्यानंतर ते आपली पुस्तके वगैरे उचलून सभागृहाच्या बाहेर जाण्यासाठी निघाले. त्यावेळी मी बोलण्यासाठी उभा राहिल्यानंतर प्रथम त्यांचा उल्लेख केला आणि म्हटले की, चंद्रशेखरजी, आपण सदनाचे जेष्ठ सन्माननीय सदस्य आहात. या ठिकाणी जे जे सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहतात ते शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी उभे राहतात.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपणही शेतक-याचे सुपुत्र आहात. शेतक-यांच्या प्रश्नावर या सदनामध्ये चर्चा चाललेली असताना विरोधकांची जी काही मते असतील ती आपण ऐकून घेतली पाहिजेत अशी माझी विनम्र सूचना आपण मान्य केली तर बरे होईल. त्यावेळी ते झटकन मागे फिरुन आपल्या आसनावर येऊन बसले. लोकशाहीबद्दल किती आदर आणि निष्ठा असू शकते याचे चंद्रशेखर हे एक ज्वलंत उदाहरण होते. अशी अनेक उदाहरणे मी लोकसभेत पाहिलेली आहेत. ज्याना खरोखर देशामध्ये लोकशाही टिकावी, लोकशाहीच्या माध्यमातून हा देश मोठा व्हावा आणि लोकशाहीच्या माध्यमातून या देशाचा विकास व्हावा अशा प्रकारची भावना असणारे जे जे कर्तृत्ववान लोकप्रतिनिधी होऊन गेले त्यातील चंद्रशेखर हे एक होते. ते गेल्याचे दु:ख झाले आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक सदनामध्ये ताणतणावाचे क्षण येत असतात आणि अशा वेळी अशी एखादी व्यक्ती सदनामध्ये असावी की, जी व्यक्ती बोलायला उभी राहिल्यानंतर सगळे सदन त्यांचे विचार कान टवकारुन ऐकेल. अशा व्यक्तीपैकी चंद्रशेखर हे एक होते. ते फार थोडे पण प्रभावी बोलत असत. हे त्यांच्या बोलण्याचे खास वैशिष्टय होते. काल "सामना" या वृत्तपत्रामध्ये त्यांच्या विषयी एक लेख छापून आलेला आहे. लेखाचे शीर्षक आहे "बलियाचे बलराम". पुष्कळ लोकांनी हा लेख वाचला असेल, काहींनी तो वाचला नसेल. या लेखातील दोन परिच्छेद उद्धृत करुन मी माझे भाषण संपविणार आहे. लेखामध्ये असे नमूद केलेले आहे की, "11 महिन्यांचे सिंग सरकार 17नोव्हेंबर 1990च्या विश्वासदर्शक ठरावात गडगडले आणि दुस-या दिवशी चंद्रशेखर पंतप्रधान आणि देवीलाल उपपंतप्रधान झाले. या दोनच मंत्र्यांनी दहा दिवस मंत्रिमंडळ विस्ताराविना सरकार चालवले." मी पुनश्च उल्लेख करतो की त्यावेळी पंतप्रधान आणि उप पंतप्रधान या दोघांनीच 10 दिवस देशाचा कारभार इतर कोणत्याही मंत्र्यांच्या नियुक्तीविना चालविला. संसदेच्या कामकाजाविषयी वृत्तलेखन करणारे श्री. तानाजी कोलते यांनी हा लेख लिहिलेला आहे. आपल्या लेखात त्यांनी पुढे असे म्हटलेले आहे की, "पंतप्रधान हा सरकारचा प्रमुख असतो. त्याने दबावाखाली काम करु नये हा आदर्श चंद्रशेखर यांनी पाळला. पंतप्रधानपदाची शपथ घेण्यापूर्वी राज्यात किंवा केंद्रात कोणतेही मंत्रिपद स्वीकारलेले चंद्रशेखर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...

हे एकमेव नेते आहेत." आताच्या राजकारणामध्ये दबावाखाली काम करण्याची पध्दत खूप वाढलेली असल्याचे दिसून येते. पंतप्रधान पदाला न्याय देण्याची क्षमता असलेल्या लोकांनीच त्या पदावर जावे असे माझे मत आहे. त्या पदावर गेल्यानंतर कोणाच्या दबावाखाली निर्णय घेणे किंवा निर्णयाला फाटे फोडणे उचित नाही. अशा पदांवर काम करणा-या व्यक्तींमध्ये ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कॅपॅसिटी असायला पाहिजे. त्यांनी निर्धार आणि निश्चय दाखविला तर देशाचे अनुशासन चांगले होईल, देशाची संपूर्ण अर्थ व्यवस्था सुधारेल असे माझे स्वत:चे मत आहे. लेखामध्ये असेही म्हटलेले आहे की, "पंतप्रधान पदाची शपथ घेण्यापूर्वी राज्यात किंवा केन्द्रात कोणतेही मंत्रिपद न स्वीकारलेले चंद्रशेखर हे एकमेव नेते आहेत". पंतप्रधान होण्यापूर्वी त्यांनी कोणतेही मंत्रिपद भूषविले नव्हते. ते एकदम पंतप्रधान झाले. त्यांना पंतप्रधान म्हणून 7 महिन्यांचा कालावधी मिळाला. त्यामध्ये त्यांच्यामध्ये असलेली ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कॅपॅसिटी, जनतेबद्दल, शेतक-यांबद्दल, विद्यार्थ्यांबद्दल असलेला जिव्हाळा आणि प्रेम दिसून आले. ते पंतप्रधान झाल्यानंतर मंडल आयोगाच्या संदर्भात संपूर्ण देशामध्ये विद्यार्थ्यांनी निदर्शने केली होती. ही निदर्शने कमी व्हावीत, पोलिसांना त्यांच्यावर गोळीबार करावा लागू नये म्हणून त्यांनी सेना दलाला आदेश दिले. ज्यांनी या देशावर प्रेम केले, ज्यांना या देशाची, समाजाच्या सर्व प्रश्नांची पूर्ण जाणीव होती असे चंद्रशेखर आपल्यातून निघून गेलेले आहेत. दोन वर्षापूर्वी ते उत्कृष्ट संसदपटूंना पुरस्कार देण्यासाठी आपल्या विधिमंडळात आले होते. त्यावेळी त्यांनी संसदपटूविषयी अतिशय प्रोत्साहनपर भाषण केले होते.त्यांचा त्यावेळी सत्कार करुन त्यांना धन्यवाद दिले होते. मी त्यावेळी त्यांना भेटलो होतो. त्या भेटीनंतर त्यांची आणि माझी भेट झाली नाही. मी दिल्लीला विशेष जात नाही. त्यांचे विचार यापुढे ऐकायला मिळणार नाहीत याचे दु:ख होते. ज्यांनी या देशातील लोकशाहीला जास्त तगडे करण्याचे काम केले अशांमध्ये चंद्रशेखर यांचे स्थान खूप उंच होते. त्यांच्याबद्दल विनम्र भावना व्यक्त करतो आणि त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

नंतर कुमारी जयश्री खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यापूर्वी श्री.शिगम एम.....

श्री.मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय, डॉ.जे.लिऑन डिसोझा हे दोनदा या सदनामध्ये निवडून आले होते आणि मुंबईचे माजी महापौर असलेले ते मुंबईचे सुपूत्रही होते. या सदनामध्ये ते एकदा विधानसभेच्या सदस्यांमार्फत आणि एकदा राज्यपालांमार्फत अशा प्रकारे दोनदा निवडून आले होते,त्यांच्या कारकिर्दीतील काही काळ ते मंत्री म्हणून देखील कार्यरत होते. कै.लिऑन डिसोझा हे एक समाजासाठी काम करणारे व मिळून मिसळून वागणारे नेते होते. डॉ.जे.लिऑन डिसोझा हे आपल्यामधून दिनांक 27 एप्रिल,2007 रोजी निघून गेले तसेच, कै.चंद्रशेखर हे देखील आपल्यामधून दिनांक 08 जुलै,2007 रोजी निघून गेले. अशा या दोन्ही नेत्यांना मी विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो आणि सन्माननीय सभागृह नेते श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव या सभागृहामध्ये मांडला आहे,त्याला मी पाठिंबा देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग,पदवीधर) : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अध्यक्ष महाराज, सबंध जगामध्ये आणि भारतामध्ये समाजवादी विचारांना सतत धक्के बसत असतांना देखील समाजवादी विचार आपल्यापाशी ठामपणाने जखडून ठेवणारी राष्ट्रीय पातळीवरील जी अतिशय मोजकी मंडळी आहेत, त्यामध्ये कै.चंद्रशेखर यांचे स्थान अत्यंत वरचे आहे.

कै.चंद्रशेखर यांच्या कामाची सुरुवात ख-या अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झाली. ज्यावेळी भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्यावेळी त्यांचे वय अवघे 19 - 20 वर्षांचे होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विद्यार्थी चळवळीपासून त्यांच्या कामाला सुरुवात झाली. विद्यार्थी चळवळीमध्ये एक "आक्रमक नेते " म्हणून ते प्रसिध्द होते. विद्यार्थी चळवळीपासूनच कै.चंद्रशेखर यांना सर्वश्री आचार्य नरेंद्र देव, राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण यांचा सहवास लाभला होता, त्यामुळे त्यांच्यामधील परखड व समाजवादाचे विचार त्यांनी अतिशय ठामपणे आयुष्यभर जपून ठेवले. सत्ताधारी पक्षामध्ये ज्यावेळी ते गेले, त्या वेळी त्यांना असे विचारण्यात आले होते की, तुमचे हे विचार ऐकून तुम्ही येथे कसे काय राहू शकणार ? त्या वेळेला प्रश्न विचारणा-या व्यक्तिला त्यांनी उत्तर दिले होते की, तुम्ही माझे विचार येथे उद्धृत करावे आणि ते केल्यानंतर मला खात्री आहे की, तुम्ही म्हणाल की मी येथे राहू शकतो. त्यानंतर पंतप्रधान म्हणून जे पद त्यांना मिळाले, त्यावेळेला सुध्दा कोणीतरी त्यांना विचारले की, या उच्च पदावर तुम्ही किती दिवस राहणार ? या प्रश्नाला त्यांनी सहजपणे असे उत्तर दिले की, माऊंट एव्हरेस्टवर मनुष्य किती दिवस राहतो ? हे अत्युच्च पद आहे, या पदावर किती दिवस राहावयाचे याची मला पूर्ण जाणीव आहे,याही सर्व स्थितीमध्ये जो पाच-सात महिन्याचा कालखंड होता त्या कालखंडामध्ये त्यांनी अतिशय ठामपणाने निर्णय घेतले. पंतप्रधान म्हणून त्यांच्या पाच - सात महिन्यांच्या कारकीर्दीमध्ये त्यांनी ठामपणे घेतलेल्या अनेक निर्णयांपैकी एक दोन निर्णय आता या सभागृहामध्ये सांगण्यातही आले. या अल्प कालखंडात त्यांनी जे निर्णय घेतले होते ते अतिशय धैर्याने घेतलेले निर्णय होते. इतक्या कमी वेळामध्ये सुध्दा अगदी मजबूतपणाने एखादा मनुष्य काम करु शकतो. कै.चंद्रशेखर यांचे हे समाजवादाविषयीचे विचार त्यांच्या " डॉयनॅमिक्स ऑफ सोशल चेंज " या अतिशय प्रसिध्द अशा प्रकारच्या पुस्तकामध्ये शब्दबध्द करुन ठेवलेले आहेत. सातत्याने आठ वेळा लोकसभेवर निवडून येणे म्हणजे आजच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

काळामध्ये साधी गोष्ट नाही, परंतु लोकांच्या मनामध्ये असलेले त्यांचे स्थान अढळ आहे. कै.चंद्रशेखर यांनी समाजवादाच्या मजबूत पकडीने सतत काही गोष्टी सांभाळल्या. राजकीय पक्षात बदल झाले तरीही ते आपल्या भूमिकेशी ठामच असत. राज्यसभेमध्येही त्यांनी काही काळ सदस्य म्हणून काम केले. मजबुतपणाने समाजवादी विचारांशी निष्ठा ठेवून यशापयशामध्ये सुध्दा समाजवादाचे विचार ठामपणाने जवळ बाळगणारा एक हरहुन्नरी नेता म्हणून भारताच्या इतिहासामध्ये त्यांचा सातत्याने उल्लेख केला जाईल. कै.चंद्रशेखर यांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

तसेच,मुंबईचे माजी महापौर आणि या सदनाचे माजी सदस्य कै.जे.लिऑन डिसोझा यांना सुध्दा मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी स्वर्गीय श्री. चंद्रशेखर माजी पंतप्रधान आणि माजी मंत्री डॉ. लिऑन डिसोझा यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखरजी यांच्याबरोबर 1970-72 या कालखंडामध्ये आम्हांला काम करण्याची संधी मिळाली. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे समाजवादी विचारसरणीला भारुन काँग्रेस पक्षातील तरुण पिढीमध्ये 1969 च्या दरम्यान जे परिवर्तन आले त्यामध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण, गरिबी हटावचा नारा, 20 सूत्री कार्यक्रम तसेच राजा-महाराजांचे तनखे काढून घेणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले. आझाद मैदानामध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनामध्ये यंगस्टर्स आणि आक्रमक नेते म्हणून ज्यांचा उल्लेख झाला त्यात चंद्रशेखरजी हे प्रमुख नेते होते. त्या यंगस्टर्समध्ये मला आठवते की, श्री. मोहन धारिया, रामधन आणि शशीभूषण अशा तरुणतुर्कांनी संपूर्ण देशातील तरुण वर्गावर प्रभाव टाकला होता. काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्टिक ॲक्शन नावाची संघटना निर्माण केली. 1971 च्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये 2/3 बहुमत जरी काँग्रेस पक्षाला मिळाले असेल आणि 1972 च्या सर्व राज्यातील विधानसभांच्या निवडणुकांमध्ये जरी काँग्रेस पक्षाची सत्ता आली असली तरी सुध्दा ज्या विचारधारेला चालना मिळाली होती ती काँग्रेस पक्षातील चंद्रशेखर यांच्या काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्टिक ॲक्शन या विचारधारेला मिळाली होती. माननीय श्री. शरद पवार साहेब त्यावेळी याचे प्रमुख होते आणि राज्याचे फोरमचे प्रमुख म्हणून आजचे केंद्रीय मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे हे होते. आजचे राजकारण आणि त्यावेळेचे राजकारण खूपच बदललेले आहे. त्यावेळेचे ते मंतरलेले दिवस होते. तरुण पिढीला काँग्रेस पक्षाचे आकर्षण होते. माननीय सदस्य श्री. उल्हास पवार आणि आमच्यासारखी तरुण मंडळी युवक संघटनेमध्ये काम करीत होती. त्यावेळेचे युवक संघटनेचे पदाधिकारी आजच्या पदाधिकाऱ्यांप्रमाणे फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये रहात नव्हते. मला आठवते की, श्री. मोहन धारिया यांच्यासारखे तरुण नेते आमदार निवासामध्ये रहात होते आणि त्यांच्याबरोबर इतर तरुण नेते गप्पागोष्टी करताना आम्ही पाहिलेले आहेत. ही सर्व पुढारी मंडळी आमदार निवासात रहात होती. त्यावेळी आजच्यासारखे फाईव्ह स्टार कल्चर नव्हते किंवा संस्कृती नव्हती. चंद्रशेखर यांच्यासारखा एक प्रगल्भ नेता की ज्याने संपूर्ण नव्या पिढीसमोर समाजवादी विचारांचा आदर्श निर्माण केला आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे श्री. चंद्रशेखर यांनी आयुष्यामध्ये कुठलेही सत्तेचे पद भोगले नाही आणि जे सत्तेचे पद भोगले ते देशाचे पंतप्रधान म्हणून भोगले होते. पंतप्रधान होण्यापूर्वी त्यांनी राज्यमंत्री, मंत्री म्हणून कधीही काम केले नव्हते. देशाचे थेट पंतप्रधान म्हणून पद भूषविलेले ते एकमेव नेते होते. देशाचे पंतप्रधान म्हणूनच त्यांनी काम केले. असा हा थोर नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

त्याचप्रमाणे माजी मंत्री डॉ. लिऑन डिसोझा यांचेही दु:खद निधन झाले आहे. मुंबईचे महापौर म्हणून त्यांनी काम केले होते. 1972 पासूनच्या काळामध्ये बॅ.रजनी पटेल यांचे ते सहकारी होते. मुंबई युवक कॉंग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. दारुबंदी खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी काम केले होते. त्यानंतरच्या सर्व प्रसंगांचा मी साक्षीदार आहे. या दोन्ही नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करुन माझे दोन शब्द संपवितो.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : माननीय सभापती महोदय, स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय लोकशाहीला ज्यांनी योगदान दिले अशांमध्ये कै.चंद्रशेखर यांचे नाव प्राथम्याने घ्यावे लागेल. आणीबाणीच्या विरोधात जी मंडळी ठामपणे उभी राहिली त्यामध्ये चंद्रशेखर हे सुध्दा होते. त्यांच्या भारत यात्रेमध्ये मी काही पावले चाललो होतो आणि एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आम्हाला पहायला मिळाले. लोकशाहीबाबत या व्यक्तिने कधीच तडजोड केली नाही. आणीबाणीचा काळ असेल, संसदेतील अनेक घटना असतील, पक्षांतर्गत घटना असतील ते सदोदित ठामपणे उभे राहिले. भारतीय समाजवादाच्या उभारणीत आचार्य नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण या तिघानंतर सर्वात मोठे नाव चंद्रशेखर यांचे आहे. यापुढील काळात समाजवादी चळवळीचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्यामध्ये त्यांचे नाव आवर्जून घेतले जाईल. ते स्वभावाने अतिशय ॲक्टिव्ह होते. त्यांचा अट्टाहास मुल्यांसाठी होता. त्याची किंमत ते राजकीय करिअरमध्ये वारंवार चुकवत आले होते. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्यावर त्यांनी कधीच तडजोड केली नाही. शहाबानो खटल्यानंतर पक्षांतर्गत निर्माण झालेल्या संकटाविषयी ते ठामपणे भूमिका घेऊ शकले. एका बाजूला प्रमिलाताई आग्रहाने शहाबानो प्रकरणाच्या संदर्भात मांडणी करीत असताना दुसऱ्या बाजूला त्यांना समजावताना त्यांची त्रेधातिरपीट उडाली होती. त्यांच्यावर आरोप झाले तरीही त्यांनी आपली धर्मनिरपेक्षतेची भूमिका आणि संकल्पना ठामपणे मांडली आणि कार्यकर्त्यांना समजावून दिले. शेवटी प्रमिलाताई आणि इतर मंडळींना माघार घ्यावी लागली. त्यावेळचे त्यांचे धीरोदात्त दर्शन अचंबित करणारे होते. जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर कै.मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. त्यानंतर त्यांच्याशी कटुता निर्माण झाली. ती अखेरपर्यंत संपली नाही. त्यांना पंतप्रधान पद मिळाले. परंतु कटुतेच्या पार्श्वभूमीवर ते पद त्यांना फारसे न्याय देऊ शकले अशातला भाग नाही. ऑपरेशन ब्ल्यू स्टारनंतरची त्यांची प्रतिक्रिया पाहिली तर अनेकांना न आवडणारी अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. याची मोठी किंमत देशाला, लोकशाहीला आणि धर्मनिरपेक्षतेला भोगावी लागेल असे ते म्हणाले होते. ते पुढच्या अनेक घटनांमधून आपल्या लक्षात आले. ज्या ज्यावेळी अशी वादळे निर्माण झाली त्यावेळी सर्वोच्च पातळीवर असणाऱ्या नेत्यांकडून किंवा यंत्रणेकडून ज्या चुका झाल्या त्या लक्षात घेतल्यातर चंद्रशेखर काय म्हणत होते हे आपल्या लक्षात येईल. अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाला मी अभिवादन करतो आणि डॉ.जे.लिऑन डिसोझा यांच्या संदर्भात जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला मी पाठिंबा देण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान चंद्रशेखरजी यांचे नुकतेच दिनांक 8 जुलै, 2007 रोजी निधन झाले. विद्यार्थी चळवळीपासून ते सामाजिक, राजकीय चळवळीमध्ये ज्यांनी आपले पूर्ण आयुष्य झोकून दिले ते चंद्रशेखरजी सातत्याने प्रकाशझोतामध्ये राहिले. बंडखोरीकडे झुकणारा विलक्षण फटकळपणा हा चंद्रशेखरजी यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य घटक होता. या कारणास्तव अनेक वेळेस ते कटुता व अप्रियतेचे धनीही झाले. परंतु त्यांनी राजकारणातली टीकाकाराची भूमिका अखेरपर्यंत सोडली नाही.

माननीय मोहन धारिया, रामधन, कृष्णकांत यांच्यासारख्या समविचारी तरुण नेत्यांसह त्यांनी आपला पक्षांतर्गत दबावगट तयार केला व त्यामुळेच ते "तरुण तुर्क" म्हणून ओळखले जाऊ लागले. 1975 मध्ये त्यांनी इंदिरा गांधी यांच्या आणीबाणी लादण्याला विरोध केला. जयप्रकाशजींच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे ते उघड समर्थक झाले. परिणामी त्यांना काँग्रेसमधून बाहेर पडण्याबरोबरच तुरुंगाची हवाही खावी लागली. जयप्रकाशजींच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या जनता पक्षाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले आणि तेव्हापासून त्यांच्याकडे भावी पंतप्रधान किंवा पंतप्रधान होऊ शकणारा नेता म्हणून पाहिले गेले.

दोन वेळा राज्यसभेवर व तब्बल आठ वेळा लोकसभेवर निवडून जाण्याचा त्यांनी विक्रम केला आणि थोड्या कालावधीचे का होईना त्यांनी सन 1990-91 मध्ये देशाचे पंतप्रधानपद भुषविले.

सन 1995 मध्ये लोकसभेतील कामगिरीबद्दल त्यांना "सर्वोत्कृष्ट संसदपटू" पुरस्काराने सन्मानित करुन त्यांचा सर्वश्रेष्ठ खासदार म्हणून गौरव करण्यात आला. याच महान व्यक्तिच्या हस्ते महाराष्ट्र विधीमंडळातील सदस्यांना राष्ट्रकूल संसदीय मंडळातर्फे "उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण पुरस्कार" नागपूर येथे दिनांक 18 डिसेंबर, 2003 मध्ये देण्यात आला, त्या पुरस्काराचा मी एक मानकरी होतो.

..3..

श्री.जयंत प्र.पाटील.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रशेखरजींबद्दल कितीतरी विषयांवर बोलता येण्यासारखे आहे. परंतु वेळेचे भान ठेवून मी अशा या आदरयुक्त नेत्यांच्या पवित्र स्मृतींना माझे विनम्र अभिवादन करुन त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने आदरांजली अर्पण करतो.

तसेच या सभागृहाचे माजी सदस्य व माजी राज्यमंत्री डॉ.जे.लिऑन डिसोझा यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन त्यांनाही माझ्या पक्षातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यावर ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, राष्ट्राच्या उन्नतीसाठी अनेक व्यक्ती छोटया-मोठया स्वरुपात काम करीत असतात आणि त्यामुळे भारत घडविण्यामध्ये त्यांचा निश्चितपणे हातभार असतो. भारत घडविण्यामध्ये माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखरजी यांचे एक वेगळे स्थान आहे. माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखर यांची आणि माझी भेट झाली त्यावेळी मी सैन्यामध्ये अधिकारी होतो. पंजाबमधील दहशत संपविण्याच्या संदर्भात एक मिटींग झाली होती त्यावेळी मी स्वत: त्या मिटींगला हजर होतो. पंजाबमधील दहशतवाद संपविण्याच्या संदर्भात उपस्थित अधिका-यांनी वेगवेगळया उपाययोजना सूचविल्या होत्या. त्यावेळी कै.चंद्रशेखर यांनी पाचच मिनिटांत आपले विचार व्यक्त केले आणि त्यात त्यांनी एवढेच सांगितले की, पुढील दोन वर्षात पंजाबमध्ये दहशतवाद नावाला सुध्दा राहणार नाही यासाठी तुम्हाला जे काही करावयाचे असेल ते खुशाल करा आणि त्यासंदर्भात तुमचा जो काही प्रस्ताव असेल तो सादर करावा. या मुद्यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती म्हणजे त्यांची निर्णय घेण्याची क्षमता. कै. चंद्रशेखर यांच्यामध्ये पटकन निर्णय घेण्याची क्षमता होती. ते निर्णय घेतांना चर्चेमध्ये जास्त वेळ कधीही लावत नसत. राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने कुठलेही निर्णय विचार करुन पटकन घेत असत. योग्य निर्णय पटकन घेणे हा त्यांचा स्थायीभाव होता. मी या सर्वोच्च सभागृहात बसलेलो आहे ते सुध्दा कै. चंद्रशेखर यांच्यामुळेच. मी त्यावेळी 10 एप्रिल रोजी राजीनामा दिला आणि 26 तारखेला फॉर्म भरावयाचा होता. सभापती महोदय, राजीनामा देऊन 16 दिवसात खासदारकीचा फॉर्म सुध्दा मी त्यांच्यामुळेच भरु शकलो. मी ज्यावेळेस राजीनामा दिला त्यावेळेस त्यांनी स्वत: राजीवजींना फोन केला होता. त्या काळात कै. चंद्रशेखरजी आणि राजीवजी यांच्यात काही कारणामुळे कटुता होती. असे असतांनाही सगळी कटुता बाजूला सारुन त्यांनी राजीवजींना फोन केला आणि चार दिवसात मेजर सावंतांचा राजीनामा मंजूर झाला पाहिजे असा राजीव गांधी यांनी आदेश दिला आणि मी खासदार झालो. कै.चंद्रशेखरजींच्या व्यक्तिमत्वाचा ठसा हा वेगळाच आहे. कुठलाही प्रश्न असो त्यासंदर्भात ते ज्यावेळी निर्णय घेत असत त्यावेळी ते मागील कोणत्याही कटू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत.....

गोष्टी लक्षात ठेवत नसत. संसदेत मी त्यांना अगदी जवळून काम करतांना बघितलेले आहे. स्वर्गीय चंद्रशेखरजी आरबीट्रेंटर म्हणून काम करीत असत. ज्यावेळेस वेगवेगळे मतभेद व्हावयाचे त्यावेळेस ते सहमतीच्या मुद्यावरच भर देत असत. राष्ट्राची सुरक्षा आणि इतर काही महत्वाचे विषय असल्यास सगळयांनी आपापले विचार व्यक्त केल्यानंतरच ते आपले मत व्यक्त करीत असत. मला त्यांचा यासंदर्भात चांगला अनुभव आहे. त्यांनी जे काही मत मांडलेले असायचे ते मत सगळयांना मान्य असायचे. त्यांचे व्यक्तीमत्त्व, विचार, समाजवाद हा आपल्या भारतापुढील ठेवा आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही त्यामुळे मी माझ्या पक्षाच्या वतीने माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखर यांना तसेच कै. डॉ. जें.लिऑन डिसोझा यांना आदरांजली अर्पण करतो व या सदनाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाच्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सदनाचे नेते, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी या देशाचे माजी पंतप्रधान कै.चंद्रशेखरजी तसेच या सदनाचे सदस्य कै. डॉ. जें.लिऑन डिसोझा यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी व यासंदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सन 1960 ते 2007 अशी 47 वर्षे भारतीय राजकारणाच्या घडामोडीतील कै.चंद्रशेखरजी एक महत्वाचे साक्षीदार होते. या कालावधीत देशाच्या राजकारणामध्ये जे महत्वाचे निर्णय झाले,

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील.....

ज्या घटना घडल्या त्या घटनांवर प्रभाव टाकणारा एक नेता काळाच्या पडद्याआड गेलेला आहे. आचार्य नरेंद्र देव, डॉ.राममनोहर लोहिया यांच्या विचाराने प्रभावित होऊन विद्यार्थीदशेमध्ये ते समाजवादी चळवळीकडे ओढले गेले. त्यांनी विद्यार्थीदशेत समाजवादी विचार स्वीकारले आणि ते शेवटपर्यंत उराशी बाळगले. समाजवादासाठी त्यांनी संपूर्ण जीवन वेचले. 1960 च्या दशकात समाजवादी पक्षातून काँग्रेस पक्षात जे तरुण नेते गेले त्यामध्ये चंद्रशेखर प्रमुख होते. काँग्रेसमध्ये समाजवाद आहे अशी समजूत त्यावेळी अनेक तरुणांमध्ये झाली होती. त्या तरुणांपैकी चंद्रशेखर हे एक होते. प्रस्थांपिताविरुध्द स्व.इंदिरा गांधी यांनी भूमिका मांडली त्यावेळी त्यांना पाठिंबा देण्यामध्ये चंद्रशेखर अग्रेसर होते. काँग्रेस पक्षाला पुरोगामी विचार करायला भाग पाडणाऱ्यांपैकी ते एक होते. त्यामुळे त्या काळात बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय स्व.इंदिरा गांधी यांनी केले. नंतरच्या काळामध्ये स्व.इंदिरा गांधी यांच्यामध्ये अधिकारशाही, हुकूमशाही प्रवृत्ती निर्माण होत आहे असे दिसल्यानंतर त्यांना विरोध करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

सन 1970 च्या दशकाच्या सुरुवातीला या देशामध्ये काँग्रेस सरकार विरुध्द एकप्रकारे असंतोषाचे वातावरण निर्माण झाले, विद्यार्थी चळवळ सुरु झाली. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याकडे चंद्रशेखर आकर्षित झाले. सुरुवातीला इंदिरा गांधी यांनी जयप्रकाश नारायण यांच्याशी सुसंवाद साधावा यासाठी प्रयत्न केले, परंतु ते निष्फळ ठरले. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीला चंद्रशेखर यांनी पाठिंबा दिला. चंद्रशेखर यांना आणीबाणीमध्ये तुरुंगवास सोसावा लागला. आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत जनता पक्षाला यश लाभले. त्या यशामध्ये चंद्रशेखर यांचा फार मोठा वाटा होता. आपल्या व्यक्तीमत्वाने आणि प्रभावी वक्तृत्वाने संपूर्ण देशातील मतदारांमध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण केला होता. जनता पक्षामध्ये ते एक प्रमुख नेते होते. मोरारजी देसाई यांनी पंतप्रधान पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर चंद्रशेखर जनता पक्षाचे अध्यक्ष झाले आणि त्यांनी पक्ष संघटना बांधण्याचे काम मनापासून केले. पक्ष संघटना आणि समाज यांच्यामध्ये समन्वय निर्माण व्हावा, कार्यकर्त्यांना जनतेचे प्रश्न समजावेत या उद्देशाने त्यांनी कन्याकुमारी ते दिल्ली अशी जवळपास चार हजार कि.मी.पदयात्रा काढली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील.....

सन 1989 मध्ये चंद्रशेखर यांनी जनता दलाच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत जनता दलाला चांगले यश मिळाले. त्यावेळीही त्यांना पंतप्रधान पद मिळाले नाही. त्यातून मतभेद निर्माण झाले. जनता दलातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी अल्पकाळासाठी पंतप्रधान पद भूषविले. तेवढ्या अल्पकाळामध्ये त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. राजकारण आणि प्रशासन यांच्याशी कटुता घेण्यास ते कचरत नसत.

सन 1990 नंतर देशात जागतिकीकरणाचे वातावरण निर्माण झाले. जागतिकीकरणामुळे आणि खाजगीकरणामुळे सर्वसामान्य माणूस भरडला जाईल अशी त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी जागतिकीकरणाला आणि खाजगीकरणाला ठामपणे विरोध केला. समाजवादी विचारांवर निष्ठा ठेवून शेवटपर्यंत समाजसेवा करणाऱ्या थोर नेत्याचे दिनांक 8 जुलै 2007 रोजी दु:खद निधन झाले,

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील....

ही अत्यंत दु:खदायक अशाप्रकारची घटना आहे. भारतीय राजकारणामध्ये त्यांच्या निधनाने एक पोकळी निर्माण झाली असून समाजवादी विचारांचा एक स्तंभ आज कोसळला आहे. त्यांच्या निधनाबद्दल मी विनम्र आदरांजली अर्पण करतो. तसेच, या सदनाचे माजी सदस्य डॉ.जे.लिऑन डिसोझा यांच्या निधनाबद्दलही मी दु:ख प्रकट करतो व त्यांना आदरांजली अर्पण करुन मी थांबतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, समाजवादी विचारांच्या क्षितीजाचा तारा हरपला, अशी भावना व्यक्त करुन मी माजी पंतप्रधान श्री.चंद्रशेखर यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण करते. संपूर्ण भारतामध्ये आणीबाणीच्या विरोधामध्ये विद्यार्थ्यांचे, युवकांचे जे आंदोलन झाले होते, त्यामध्ये अनेक विचारप्रवाहांतील युवक, विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये एकाअर्थाने अखील भारतीय विद्यार्थी परिषद, युवक क्रांती दल, समाजवादी युवक परिषद अशा अनेक संघटना व लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनानुसार एक पिढी संपूर्ण भारतामध्ये तयार झाली होती. त्यावेळी त्यातील अनेक लोक वेगवेगळया चळवळीमध्ये गेले होते. सन्माननीय चंद्रशेखरजी यांनी ज्यावेळी संपूर्ण भारतभर पदयात्रा केली, त्यावेळी भारताच्या कानाकोप-यातील तरुणांना, कार्यकर्त्यांना, नेत्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न पदयात्रेमध्ये झाला होता. एक माणूस, एक व्यक्ती, एक नेता ज्यावेळी संपूर्ण भारतभर पदयात्रा करतो, त्यावेळी त्यातून काय साध्य होणार ? असा प्रश्न अनेक टीकाकार विचारत असतात. त्याचप्रमाणे चंद्रशेखरजी यांच्या पदयात्रेच्या संदर्भात समाजवादी चळवळीमध्ये देखील अनेक मत मतांतरे होती. याबाबतीत जरी मोठयाप्रमाणात स्वागत झाले असले तरी देखील अनेकजण विचारत होते की, यातून चंद्रशेखरजींना काय साध्य करावयाचे आहे ? थोडयाशा विनोदातून परंतु त्याला एकप्रकारचा अर्थ असणारे ते बोलत असत व त्यातून त्यांच्या स्वत:मध्ये खूप परिवर्तन झाले. त्यावेळी त्यांनी जनतेचे संपूर्ण प्रश्न समजून घेतले. परंजवडी येथे जे भारतयात्रा केंद्र आहे, त्यातील महिलांच्या संदर्भातील त्यांचे जे काम होते, त्याच्याशी माझाही चांगल्या प्रकारचा परिचय होता. नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमधील अनेक कार्यक्रमांना चंद्रशेखरजी स्वत: उपस्थित राहत असत. त्यांचे प्रत्येकाशी संवाद ठेवण्याचे जे वैशिष्टे होते, त्याचा याठिकाणी मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. ज्यावेळी राजकीय मतभेद असतात त्यावेळी कळत नकळत मान फिरवून घेण्याची प्रवृत्ती आपल्यामध्ये तयार होत असते आणि अशावेळी कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी स्वत:च्या संवादाचा पूल जर चालू ठेवला तर बऱ्याच गोष्टींना राजकारणामध्ये चांगल्या प्रकारे वळण देता येते. म्हणूनच चंद्रशेखरजींच्या निधनानंतर दैनिक सामनामध्ये सन्माननीय शिवसेना प्रमुख, श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी स्वत: चंद्रशेखजींबद्दलच्या अनेक हृद्य आठवणी व्यक्त केल्या. वैचारिक मतभेदांच्या पलीकडे जाऊन असणारे एक व्यक्तिमत्व आणि अकृत्रिम असा स्नेह

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आज हरवला. अशाप्रकारचा स्नेह अनेक समाजवादी नेत्यांबद्दल सन्माननीय शिवसेना प्रमुख, श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्यामध्ये आहे. त्यामध्ये जसे जॉर्ज फर्नांडिस यांच्या नावाचा समावेश आहे, तसेच चंद्रशेखरजींचेही एक वेगळे स्थान शिवसेना प्रमुख, श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या मनामध्ये आहे. म्हणून त्यांनी त्यांच्या स्वत:च्या शब्दांमध्ये त्यांना गौरवलेले आहे.

या सदनाचे सन्माननीय माजी सदस्य, डॉ.जे.लिऑन डिसोझा हेही समाजवादी चळवळीशीच संबंधित होते. विशेषत: गोवा मुक्ती आंदोलनामध्ये त्यांनी महत्वाचे काम केले. अनेक गोरगरीब जनेतेशी जोडलेले हे नेतृत्व होते. या दोनही नेत्यांना मी श्रध्दांजली व्यक्त करते. या सदनाचे नेते सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी तसेच शिवसेना नेत्यांनी व भाजपा नेत्यांनी व इतर नेत्यांनी ज्या दु:खद भावना व्यक्त केल्या आहेत, त्यामध्ये माझ्या शब्दसुमनांनी त्यांना श्रध्दांजली व्यक्त करते व माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद !

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सदनाचे नेते, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो या सदनामध्ये दुखवटा प्रस्ताव मांडला आहे, आणि त्या प्रस्तावाबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते व गटनेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्यानुषंगाने याठिकाणी मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

भारतीय राजकारणामध्ये असंघटित, सामान्य समाजाला सातत्याने संघटित करण्याचा प्रयत्न गेल्या 50 वर्षात त्यांनी सातत्याने केला आहे. एक अत्यंत प्रखर देशभक्त या नात्याने प्रसंगी अत्यंत परखडपणे विचार मांडून देशाला योग्य पद्धतीची दिशा त्यांनी दिली. सत्तेच्या राजकारणापासून काहीसे दूर राहून देशामध्ये सर्वसामान्य समाजाचे नेतृत्व करता येते, सर्वसामान्यांचे राजकारण करता येते हे त्यांनी आपल्या कृतीने दाखविले आहे आणि माझ्या अनेक सहकारी मित्रांनीही या गोष्टीचा उल्लेख केला आहे की, सत्तेच्या राजकारणामध्ये कुठेही न रहाता सत्तेच्या अत्युच्च अशा शिखरावर स्वर्गीय चंद्रशेखर आपल्या कर्तुत्वाने पोहोचले आणि देशाचे काही काळपर्यन्त पंतप्रधानही झाले.

स्वर्गीय चंद्रशेखर यांचे संपूर्ण जीवन बघितले तर विद्यार्थी दशेपासून एक अत्यंत चळवळया अशा पद्धतीचा विद्यार्थी नेता, आचार्य नरेंद्र देव यांच्या मुशीत तयार झालेले हे ध्येयवादी आणि जबरदस्त नेतृत्व, राम मनोहर लोहिया आणि नंतरच्या काळामध्ये जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले हे नेतृत्व होते. देशाच्या कानाकोप-यामध्ये सर्वसामान्य समाजाने संघटित व्हावे, सर्वसामान्य जनतेला सुदृढ लोकशाही मिळावी, लोकशाहीला बळकटी मिळावी या अनुषंगाने कुणाचीही भीड न बाळगता या देशामध्ये लोकसभा असेल, अन्य कुठलेही व्यासपीठ असेल त्या ठिकाणी परखड पद्धतीचे विचार त्यांनी मांडले आहेत. मला या गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल की, सलग आठ वेळा लोकसभा निवडणुकीमध्ये यशस्वी होणे, राज्यसभेवर अत्यंत तरुण वयामध्ये निवडून येणे आणि सत्तेची अनेक दालने जवळ येत असतांना तत्वाकरिता सत्तेचा त्याग करणे या अनुषंगाची त्यांच्या आयुष्यातील अनेक उदाहरणे आपण पाहू शकतो. काँग्रेस संघटनेमध्ये ते काही काळ स्थिरावले. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे ते सरचिटणीसही झाले, काही काळ संसदीय दलाचे नेतेही होते. अशा पद्धतीच्या एका जबरदस्त वैचारिक नेत्याचा 'तरुण तुर्क नेता' म्हणून आम्हाला परिचय होता. त्यांनी ख-या अर्थाने आयुष्यभर प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. या देशामध्ये संस्थानिकांचे तनखे बंद करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे अशा पद्धतीचे अनेक धाडसी निर्णय घेण्याच्या अनुषंगाने मघाशी काही वक्त्यांनी सांगितल्याप्रमाणे स्वर्गीय चंद्रशेखर यांनी पक्षांतर्गत जो अभ्यास केला त्यामुळे त्या वेळच्या काँग्रेस नेतृत्वाला काही निश्चित निर्णय घेणे आवश्यक झाले.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

स्वर्गीय चंद्रशेखर महाराष्ट्रामध्ये विशेषत: महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळयाच्या अनावरण समारंभप्रसंगी सन 1990 मध्ये या ठिकाणी आले होते. त्यावेळी त्यांनी प्रकट केलेले विचार बघितले तर त्यांनी असे सांगितले होते की, देशातील लोकशाही ख-या अर्थाने सुदृढ करावयाची असेल तर लोकशाहीमध्ये विधानसभा असो, लोकसभा असो त्या ठिकाणी सुध्दा लोकशाहीच्या अनुषंगाने परखड विचार मांडण्याची परंपरा निर्माण केली पाहिजे. 18 डिसेंबर 2003 मध्ये नागपूरला त्यांना ज्यावेळी राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण केलेल्या आमदारांना पुरस्कार प्रदान करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते त्यावेळी त्यांनी केलेले भाषण बघितले तर त्यांनी स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या काळातील एक अनुभव सांगितला होता.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

त्यांनी असे सांगितले होते की, आपले विरोधक कितीही परखडपणे बोलले तरी विरोधकांचे विचार समजून घेणे, त्यावर विधायक दृष्टीकोनातून विचार करणे आणि लोकशाहीमध्ये त्या चर्चेला ख-या अर्थाने स्थान देणे या पद्धतीने आपण केले तर आपल्या देशाची लोकशाही सुदृढ होईल, हे त्यांचे नागपूरच्या कार्यक्रमातील विचार आहेत. कै.चंद्रशेखर आपल्यातून निघून गेलेले आहेत. भारतीय लोकशाहीच्या अनुषंगाने आणि देशाच्या कानाकोप-यामध्ये विखुरलेले जे सर्वसामान्य कार्यकर्ते आहेत त्यांच्या दृष्टीने हे कधीही भरुन न येणारे नुकसान आहे, आपले राष्ट्रीय नुकसान आहे, एक प्रकारे देशाची हानी आहे. त्यांचा ध्येयवाद ऊराशी बाळगून सातत्याने मनन केले तर उपेक्षित समाजाला जास्तीत जास्त ताकद मिळेल, न्याय मिळेल. यासाठी तुम्ही, आम्ही प्रयत्नांची पराकाष्टा करणे हीच ख-या अर्थाने कै.चंद्रशेखर यांना या सदनाच्या माध्यमातून श्रध्दांजली ठरेल, असे मला वाटते.

कै.जे.लिऑन डिसोझा यांनी गोवा स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रिय भाग घेतला होता. त्यांना मुंबई महानगरपालिकेचे महापौर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ते दोन वेळा विधानपरिषदेचे सदस्य होते आणि नंतरच्या काळामध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम केले होते. कै.जे.लिऑन डिसोझा हे सुध्दा समाजवादी विचारसरणीचे आणि अत्यंत प्रखर पद्धतीचे ध्येयवादी कार्यकर्ते होते.

माजी पंतप्रधान कै.चंद्रशेखर आणि माजी मंत्री कै.जे.लिऑन डिसोझा यांना या सदनाच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे रहावे व शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भारताचे माजी पंतप्रधान कै.चंद्रशेखर यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे कामकाज स्थगित करणे.

मु.शी.: भारताचे माजी पंतप्रधान कै.चंद्रशेखर यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान कै.चंद्रशेखर यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार दिनांक 17 जुलै, 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 03 मिनिटांनी मंगळवार दिनांक 17 जुलै, 2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही